# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

## • नाविन्यता. शाश्वतता. आधारित एक दिवसीय कार्यशाळा यशस्वी संपन्न

आयुक्त संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से. यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि मार्गदर्शनाखाली आज दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी पाणी पुरवठा, मलनि:सारण , घनकचरा, पर्यावरण, उद्यान, सामाजिक विकासावर आधारित विविध राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांचे/फर्म्सचे नाविन्यपूर्ण प्रकल्प/संकल्पनेवर सादरीकरण संपन्न झाले. या सादरीकरणा प्रसंगी अति. आयुक्त अनिकेत मनोरकर, अति. आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त मारुती गायकवाड, उपायुक्त रवी पवार, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) शरद नानेगावकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम) नितीन मुकणे, सहा. आयुक्त कविता बोरकर, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी वर्ग या अभिनव कार्यशाळेस उपस्थित होते.

शाश्वत विकास, नाविन्यता या प्रमुख बिंदूंना अनुसरून मिरा-भाईंदर शहरातील विविध प्रक्रिया प्रकल्प, योजना, पाणी पुरवठा, उद्याने,तलाव, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी बाबींवर भविष्यातील गरजा पाहता तसेच शहराला भेडसावणारे विविध प्रश्न, नागरिकांना उत्तम नागरी सुविधा पुरविणेकरीता आधुनिक व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शहराच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस २५ कंपन्यानी सहभाग नोंदवून त्यांच्याकडील शहर विकासाकरिता उपयुक्त ठरणाऱ्या विविध तंत्रज्ञानाचे, आधुनिक उपकारणांचे सादरीकरण केले.

सादर केलेल्या तंत्रज्ञांपैकी काही तंत्रज्ञान हे उपयोगी असून त्याबाबत सकारात्मकतेने विचार करून प्रायोगिक तत्त्वावर राबविणेबाबत काही अधिका-यांनी आपले मत स्पष्ट केले. त्याचबरोबर पारंपारिक पद्धतीने काम करण्याऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहराचा विकास करणे व शहरातील नागरिकांना नागरी सुविधा पुरविणे ही बदलत्या काळाची गरज आहे असे मत ही उपस्थित अधिका-यांनी व्यक्त केले. या संकल्पनेचे कौतुक करून मा. आयुक्त सो. यांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी मा. आयुक्त व उपस्थित अधिका-यांनी स्वाक्षरी मोहीम राबवली. अधिकारी वर्गाला संबोधित करताना अश्याच नवनविन संकल्पनेतून व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शहराच्या शाश्वत विकासावर भर देण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी केले.